दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | L&T SWITCHGEAR | INDOASIAN
Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक ६७ वा शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# उदगीर उप प्रादेशिक परिवहन कार्यालायचे ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते उद्घाटन

## सर्वसामान्य नागरिक, वाहनधारकांची गैरसोय दूर होणार - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे





लातूर : - उदगीर येथील उप प्रादेशिक परिवहनकार्यालयाचे आज उद्घाटन होत असून उदगीरकरांसाठी आज अतिशय आंनदाचा दिवस आहे. या कार्यालयामुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनधारक यांना परिहवन विभागाच्या सर्व सेवा उदगीर येथे उपलब्ध होणार असल्याने त्यांची गैरसोय दूर होईल, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. उदगीर शहरातील लिंबोटी प्रकल्प उद्धव जलशुद्धीकरण केंद्र येथे नव्याने सुरु होत असलेल्या एमएच-५५ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. माजी आमदार गोविंद केंद्रे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, सर्जेराव भांगे, रामभाऊ तिरुके, शिवानंद हैबतपुरे, रामराव ऐनवाड, विजय निटूरे, दिपाली आवटे आदी यावेळी उपस्थित होते. ९ ऑगस्ट या दिवसाला ऐतिहासिक महत्व असून आजच्या दिवशी उदगीर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु होत असून उदगीरच्या विकासातील हा महत्वाचा टप्पा आहे. अनेक दिवसांपासून हे कार्यालय उदगीर येथे सुरु करण्याबाबत मागणी होती. विविध मोटारवाहन चालक मालक आणि मॅकेनिकल संघटना यांनीही मागणी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात उदगीर येथे विशेष बाब म्हणून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर झाल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. उदगीर येथे सुरु झालेल्या या कार्यालयामुळे उदगीर तालुक्यासह या कार्यालयाला जोडलेल्या सर्व तालुक्यातील नागरिकांना वाहन चालक परवाना, वाहन नोंदणी, त्याचे नूतनीकरण, वाहन तपासणी आदी सर्व सुविधा मिळणार आहेत. तसेच वाहनधारकांना आवश्यक कागदपत्रे काढण्याबाबत परिवहन विभागाचे अधिकारी मार्गदर्शन करतील, असे त्यांनी सांगितले. शासनाच्या महत्वपूर्ण योजनांचा लाभ प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहचावा राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक, शेतकरी यांच्यासाठी अतिशय महत्वाचे निर्णय घेतले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना यासारख्या महत्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती गाव-खेड्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचवून त्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी उपस्थित नागरिकांना केले. प्रारंभी क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या इमारतीचे फीत कापून आणि कोनशीला अनावरण करून उद्घाटन करण्यात आले. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच विविध मोटारवाहन चालक मालक संघटनांच्या प्रतिनिधींनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

## समाज कल्याण विभागाच्या योजनांची चित्ररथाद्वारे होणार जनजागृती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दाखविली हिरवी झेंडी



लातूर :- जिल्ह्यातील ग्रामीण भागात समाज कल्याण विभागाच्या योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. या चित्ररथांना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे गुरुवारी हिरवी झेंडी दाखवली. समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त रामदास कोकरे आदी यावेळी उपस्थित होते. राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना देण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत दोन चित्ररथ तयार करण्यात आले आहेत. या चित्ररथाद्वारे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात समाज कल्याण विभागाच्या योजनांवर आधारित चित्रफिती दाखविण्यात येणार आहेत. तसेच चित्ररथावरील फ्लेक्स बॅनरद्वारे योजनांविषयी जनजागृती केली जाणार आहे.

## लातूर येथे तिरंगा यात्रेने 'हर घर तिरंगा' अभियानाची सुरुवात

### लातूर जिल्ह्यात १५ ऑगस्टपर्यंत आयोजित विविध उपक्रमांत लातूर जिल्हावासियांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे




लातूर : - भारतीय स्वातंत्र्याच्या गौरवशाली पर्वानिमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरुपी मनात राहावी, यासाठी ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. लातूर येथे आयोजित 'तिरंगा यात्रा' उपक्रमाने या अभियानाला सुरूवात झाली. या अभियानामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार असून लातूर जिल्हावासियांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी यावेळी केले. जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, स्काऊट गाईडचे श्री. चामे, जिल्हा परिषदेचे उप मुख्य वित्त व लेखा अधिकारी राजेंद्र नागणे, नायब तहसीलदार गणेश सरोदे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरीक यावेळी उपस्थित होते. 'हर घर तिरंगा' अभियानात अंतर्गत गाव, शहर व जिल्हा स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धा, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा कॅनव्हास, शासकीय आणि निमशासकीय कार्यालय,खाजगी कार्यालय, ऐतिहासिक वास्तूंवर तिरंगा रंगातील विद्युत रोषणाई केली जाणार आहे. तसेच १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११.११. वाजता सर्व शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आदी सर्व ठिकाणी एकाच वेळी तिरंगा शपथ घेतली जाईल. १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यातील सर्व घरांवर तिरंगा ध्वज फडकावून सर्व नागरिकांनी या अभियानात आपला सहभाग नोंदवावा. तसेच यंदा प्रत्येक घरी ध्वजारोहणाचा मान कुटुंबातील महिला सदस्यांना देवून लातूरचा आगळा- वेगळा पॅटर्न तयार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर- घुगे यांनी केले. प्रारंभी जिल्हा क्रीडा संकुल येथील शहीद युद्ध स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करून शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले. तसेच उपस्थितांना तिरंगा शपथ देण्यात आली. प्रास्ताविकात उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी यांनी हर घर तिरंगा अभियानाची रूपरेषा सांगितली. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## घोणसी प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीचे ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते भूमिपूजन




लातूर :- ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी आपण प्रयत्नशील असून त्यादृष्टीने जळकोट, उदगीर तालुक्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्याला प्राधान्य दिल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. जळकोट तालुक्यातील घोणसी येथे नव्याने मंजूर झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत भूमिपूजनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, जिल्हा नियोजन समिती सदस्य श्याम डावळे, तालुका आरोग्य अधिकारी संजय पवार, डॉ. प्रशांत कापसे, नायब तहसीलदार राजाराम खरात, सरपंच यादवराव केंद्रे यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व नागरीक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील रुग्णांना तात्काळ उपचार मिळावा, यासाठी घोणसी, मंगरुळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मंगरुळ येथील प्राथमिक केंद्राचे काम अंतिम टप्प्यात असून घोणसीच्या प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीचे आज भूमिपूजन होत आहे. यापुढेही ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. उदगीर आणि जळकोट तालुक्यातील नागरिकांसाठी दळणवळण सुविधा निर्माण करणे, विविध प्रशासकीय इमारती, विविध समाजाची सभागृहे, भवन उभारण्यासह महापुरुषांच्या पुतळ्यांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यापैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. या सर्व विकास कामांमुळे दोन्ही तालुक्यातील नागरीकांना चांगल्या मूलभूत सुविधा मिळत आहेत. सिंचनासाठी बॅरेज, पाझर तलावांची निर्मिती करण्यात आल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दीड हजार रुपये दरमहा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. युवकांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षण काळात शैक्षणिक अर्हतेनुसार दरमहा सहा ते दहा हजार रुपये देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या कृषि पंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच प्रत्येक पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## जवाब विचारणारच...



# मोदीजी, विनेश उपांत्य फेरी जिंकली, पण श्रेय लाटण्याची वेळ आता निघून गेली

रामायणात मंथरेनेच कैकयीच्या मनात सत्तेची अभिलाषा निर्माण केली. विनेश फोगाट माझ्या आयुष्यातली मंथरा आहे. सुरुवातीला हजारो कुस्तीपटू माझ्याविरोधात उभे होते. आज केवळ सहा जण शिल्लक आहेत बृजभूषण सिंग यांचं हे वक्तव्य. ते केलं, तेव्हा सिंग सत्ताधारी भाजपचे खासदार होते. देशाचं आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला खेळाडू त्यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप करत होत्या. पण या बाहुबली म्हणून ओळख असलेल्या खासदाराविरोधात साधा एफआयआर नोंदवण्यासठीही खेळाडूंना झगडावं लागलं. पंतप्रधानांनी आपलं म्हणणं ऐकावं, एवढी साधी अपेक्षा होती या मुलींची. न्यायासाठी त्या जिथे ठाण मांडून बसल्या ते जंतरमंतर मोदींच्या स्वप्नातल्या नव्या संसद भवनापासून अवघ्या काही किलोमीटरवर होतं. या मुली सुमारे चाळीस दिवस तिथेच थंडी–वाऱ्यात बसून होत्या. पण बेटी बचाओची घोषणा देणाऱ्या पंतप्रधानांच्या कानांपर्यंत त्यांचा आक्रोश शेवटपर्यंत पोहोचलाच नाही. जसा मणिपूरमधील महिलांचा पोहोचला नव्हता, तसाच. काल तिच विनेश जगातल्या अत्यंत मानाच्या स्पर्धेत सुवर्णपदकाच्या उंबरठ्यावर उभी होती आणि तिच्याबरोबर जंतरमंतरवर कित्येक रात्री काढलेली साक्षी मलिक हिंदीत त्या समान्याचं समालोचन करत होती. हा केवळ क्रीडाप्रेमींसाठीच नव्हे, तर मानवाच्या दुर्दम्य ध्येय्यासक्तीवर श्रद्धा असलेल्या प्रत्येकाच्याच स्मृतिपटलावर कायम कोरलेला राहील असा हा क्षण आहे.

खेलरत्न, मेजर ध्यानचंद पुरस्कार, अर्जुन पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या या खेळाडूच्या नावापुढे मंथरा, कैकयी, फुसकं काडतूस, कारकीर्द संपलेली खेळाडू अशा कितीतरी उपाध्या लावल्या जात होत्या. देशातल्या करदात्यांच्या पैशांतून यांच्यावर कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत, निषेधच नोंदवायचाच असेल, तर ते पैसे परत द्या. क्रीडा कोट्यातून मिळवलेल्या नोकऱ्या परत द्या, असली आव्हानं, सत्ताधारी आणि त्यांचे भाट खेळाडूंना देत होते. त्यांच्या आत्मसन्मानावर रोज नव्याने प्रहार केले जात होते, का? तर ज्याच्या नावावर आधीच अनेक गुन्ह्यांची नोंद आहे अशा भाजपच्या एका खासदाराविरोधात आवाज उठवला म्हणून.

नव्या संसद भवनाच्या उद्घाटनावेळी या मुली तिथे मोदींना भेटण्यासाठी गेल्या होत्या. पण त्यांना अक्षरशः फरपटत बाहेर काढण्यात आलं. ती दृश्य काल संपूर्ण दिवसभर समाजमाध्यमांवर धुमाकूळ घालत होत राहिली. मोदींनी त्यांना तत्कालीन क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांची भेट घेण्याचा सल्ला दिला. ठाकूर भेटलेदेखील, पण तोडगा निघाला नाही. आपली पदकं गंगेला अर्पण करण्यासाठी हे खेळाडू हरिद्वारला गेले होते. पण शेतकरी आंदोलनाचे नेते नरेश टिकैत आले आणि सरकारशी चर्चा करू असं सांगत त्यांना पदकं विसर्जित करण्यापासून रोखलं. भारतातले जगप्रसिद्ध खेळाडू लैंगिक शोषणाविरोधात न्याय मिळावा म्हणून रस्त्यावर बसून अश्रू ढाळत आहेत, पोलीस त्यांना फरपटत नेत आहेत, ही दृश्यं जगाने पाहिली. देशाची ओळख असलेल्या खेळाडूंना अशी वागणूक देऊन आपणं विश्वगुरू, महासत्ता कसे बनणार आहोत, हे मोदीच सांगू शकतात.

दरम्यानच्या काळात पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं आहे. कुस्तीपटूंना आंदोलन मागे घेण्यास भाग पाडलं गेलं. बृजभूषण सिंग यांनी खासदारकी गमावली आणि भारतीय कुस्ती संघटनेचं अध्यक्षपदही! त्यांच्या कैसरगंज मतदारसंघाच्या गादीवर आता त्यांचा मुलगा करणभूषण सिंग विराजमान झाला आहे. कुस्ती फेडरेशनच्या गादीवरही बृजभूषण यांचेच समर्थक संजय सिंग जाऊन बसले आहेत. मोदी पुन्हा सत्तेत आले आहेत, पण चारसो पारची स्वप्न धुळीला मिळून आघाडी सरकार स्थापन करावं लागलं आहे. कुस्तीपटूंचा कायदेशीर लढा अद्याप सुरूच आहे.

मनु भाकरने जेव्हा कांस्य पदक जिंकलं तेव्हा तिला पंतप्रधानांचा कॉल आला होता. तो व्हायरल करण्याची जबाबदारीही अनेकांनी इनामेइतबारे पार पाडली. त्यापाठोपाठ क्रीडामंत्री मनसुख मांडविय यांनी तिच्या प्रशिक्षणावर सरकारने किती खर्च केला, तिला परदेशात कुठे कुठे पाठवलं इत्यादीची आठवण करून दिली. प्रथमच संसदेत पदार्पण केलेल्या भाजपच्या खासदार कंगना रानौत यांनी काल एक्स वर म्हटलं की विनेशने मोदी तेरी कब्र खुदेगी अशा घोषणा दिल्या होत्या. तरीही तिला देशाचं प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली गेली. उत्तम प्रशिक्षण दिलं गेलं. हेच लोकशाहीचं सौंदर्य आणि एका महान नेत्याचं लक्षण आहे. विनेशला किती 'संधी' दिली, देशात कितपत लोकशाही शिल्लक ठेवण्यात आली आहे आणि विनेशचा लढा हे कशाचं 'लक्षण' आहे, हे भारतीय नीटच जाणून आहेत. असो, यशाचे अनेक दावेदार असतात.

पण या साऱ्यात उल्लेखनीय ठरला, तो विनेशचा दुर्दम्य ध्येय्यवाद. आशियाई आणि कॉमनवेल्थ स्पर्धांत सुवर्ण पदक मिळविणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू असलेल्या विनेशला सातत्याने लढा देत राहावा लागला तो दुखापतींशी. २०१६च्या ऑलिम्पिक्समध्ये सामन्यादरम्यान तिच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली. कोणत्याही खेळाडूसाठी दुखापत म्हणजे मोठा हादरा असतो. विनेशला लिगामेंट टीअरची शस्त्रक्रिया करावी लागली. २०२१मध्ये हाताच्या कोपरावर शस्त्रक्रिया झाली. पुढे डाव्या गुडघ्यावरही लिगामेंट टीअरमुळेच शस्त्रक्रिया करावी लागली. विनेश आता २९ वर्षांची आहे. त्यामुळेच यांची कारकिर्द संपत आली आहे, म्हणून हे सारे राजकारणात उतरू पाहत आहेत, अशी टीकाही या खेळाडूंवर झाली होती. थोडक्यात तिशी हा कुस्तीपटूसाठी काही फार उमेदीचा काळ मानला जात नाही, पण अथक मेहनत आणि कोणत्याही संकटापुढे नतमस्तक न होता लढा देत राहण्याची वृत्ती विनेशला इथवर घेऊन आली आहे.

भारतीय खेळाडूंना मैदानात आणि मैदानाबाहेरही अनेक स्तरांवर लढा द्यावा लागतो. क्रिकेटसारखा ग्लॅमर आणि पैसा असलेला खेळ वगळता अन्य बहुतेक खेळाडूंना आर्थिक विवंचना, फेडरेशनमधली आणि संघातलीही राजकारण, शारीरिक दुखापती, मानसिक खच्चिकरण करणारे क्षण वाढतं वय, खेळाची बदलती तंत्र, तंदुरुस्ती, जागतिक स्तरावर उत्तम दर्जाचं प्रशिक्षण घेऊन येणारे नवनवे खेळाडू अशी अनेक आव्हानं समोर असतात. फेडरेशनच्या विरोधात उघडपणे उभं ठाकणं हे कारकीर्द संपवणारं ठरू शकतं. हे ठाऊक असूनही विनेश, साक्षी बजरंग पुनिया सत्तेविरोधात उभे ठाकले. सहन करणं योग्य नाही. आज आवाज उठवला नाही, तर पुढच्या पिढ्यांनाही असंच मुकाट सारं काही सहन करावं लागेल, हा विचार त्यामागे होता. साचलेली चीड होती. आंदोलनाने ही खदखद वर आणली. अशाच स्वरूपाची मुस्कटदाबी सहन करणाऱ्या अन्य खेळाडूंसाठीच नव्हे, तर प्रत्येक महिलेसाठी व्यक्तीसाठी कुस्तीपटूंचं आंदोलन एक प्रेरणा आहे आणि शोषण करणाऱ्यांसाठी धडाही.

विनेश एक कसलेली कुस्तीपटू आहेच. अन्यथा अजिंक्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १४ वर्षांत ८२ सामन्यांपैकी एकही समाना न हरलेल्या, ४ वेळा वर्ल्ड चॅम्पियन ठरलेल्या, टोकियो ऑलिम्पिक्समध्ये प्रतिस्पर्ध्यांना एक बाउट काय एक पॉइंट सुद्धा न दिलेल्या जपानी कुस्तीपटूला हरवणं कसं शक्य होतं? तिने ते करून दाखवलं. कालचा दिवस विनेशचा होता. शेवटी खेळात हरणं जिंकणं सुरूच राहतं. महत्त्वाचं असतं आल्या क्षणात आपल्यातलं सर्वोत्तम सादर करण्याचा पूर्ण प्रयत्न करत राहणं. लढत राहणं. विनेशने ते केलं. मोदींनी विनेशला कॉल केला किंवा नाही केला तरी, कोणीही तिच्या यशावर दावे केले तरीही, ती आजही आणि यापुढेही मॅटवर असताना या साऱ्या क्षुद्रतेच्या पलीकडे असेल. दशांगुळं वरच असेल, हे निश्चित.



## संपादकीय....

### बाजीगर विनेश!

अवघ्या देशाचे आशास्थान ठरलेली भारताची झुंजार कुस्तीगीर विनेश फोगाटचे ऑलिम्पिक सुवर्णपदकाचे स्वप्न अपुरेच राहिले. सारा देश हळहळला. ऑलिम्पिकमध्ये अंतिम फेरी गाठणारी पहिली भारतीय महिला कुस्तीगीर ठरल्याचा मान विनेशने मिळवला होता; परंतु ५० किलो वजनी गटात खेळणार्या विनेशचे वजन अंतिम फेरीच्या दिवशी १०० ग्रॅम अधिक भरल्याने तिला पॅरिस स्पर्धेतून थेट अपात्र ठरवले गेले. पदकाबाबतचा स्वप्नभंग झाल्यानंतर विनेशने कुस्तीतूनच संन्यास घेऊन आणखी एक धक्का दिला आहे. 'माँ, कुश्ती मेरे से जीत गयी और मैं हार गयी. माफ करना, आपका सपना, मेरी हिम्मत सब टूट चुके. इससे ज्यादा ताकत नहीं रही अब. अलविदा कुश्ती,' असे भावनिक उद्गार तिने काढले आहेत; मात्र तांत्रिकदृष्ट्या हरतानाही ती प्रत्यक्षात बाजीगरच ठरली! ऑलिम्पिकच्या स्पर्धेत प्रतिस्पर्ध्याविरुद्ध उपांत्य फेरीचा सामना ५–० या फरकाने तिने जिंकला. जिच्याशी मुकाबला होता, तिला तिने एकही गुण घेऊ दिला नव्हता. कुस्ती स्पर्धेत प्रत्येक वजनी गटाची स्पर्धा दोन दिवस चालते. पहिल्या दिवशी उपांत्य फेरीपर्यंतच्या लढती, तर दुसर्या दिवशी अंतिम लढती होतात. दोन्ही दिवशी सकाळी ८ वाजता मल्लांचे वजन घेतले जाते. पहिल्या दिवशी स्पर्धेच्या आरंभी विनेशचे वजन ४९.५ किलो भरले; पण तीन लढतींनंतर ५२.७ किलो झाले. वजन कमी करण्यासाठी रात्रभर बिलकुल न झोपता, पाणी न पिता पळण्याचा, दोरीवरील उड्यांचा व सायकलिंगचा व्यायाम तिने केला. असंख्य उपाययोजना करूनही तिचे वजन नियमापेक्षा १०० ग्रॅम जास्तच भरले. कुस्तीत खेळाडू विविध वजनी गटांमध्ये खेळतात. त्यामुळे ज्यांचे वजन जास्त, त्या खेळाडूस कमी वजनाच्या खेळाडूशी खेळावे लागत नाही. कुस्ती, बॉक्सिंग, ज्यूदो, तायक्वांदोसारख्या लढाऊ खेळांमध्ये स्पर्धकांना समान संधी मिळण्यासाठी वजनाचा हा नियम आहे. कमी वजनाच्या खेळाडूंनी अधिक वजनी गटात जास्त वजनदार खेळाडूंसोबत खेळण्याने नुकसान होऊ शकते. त्यापेक्षा वजन कमी करून खालच्या वजनी गटात खेळण्याचा पर्याय बहुसंख्य खेळाडू स्वीकारतात; मात्र आपल्या वजनापेक्षा कमी वजनी गटात खेळणार्या कुस्तीपटूंना प्रचंड आहार नियंत्रण करावे लागते आणि त्याचा त्यांच्या शरीरावर व मनावर ताणही येत असतो. २०१६ च्या ऑलिम्पिकसाठीच्या पहिल्या आशिया पात्रता फेरीत विनेशला वजन ४८ किलो वजनी गटात आणणे कठीण गेले होते. नंतर ती पात्र ठरली; पण दुखापतीमुळे तिला माघार घ्यावी लागली. टोकियो ऑलिम्पिकमध्ये ५३ किलो वजनी गटात ती खेळली; पण उपांत्य फेरीत हरली. पॅरिसमध्ये तिचा आत्मविश्वास टोकाचा होता. सुवर्णपदक तिला खुणावत होते; मात्र वजन अधिक भरल्याने तिच्या कारकिर्दीचाच शोकांत झाला. तिला अपात्र ठरवणे हा एक डाव असू शकतो, अशी शंकाही घेतली जाते. ती अनुभवी खेळाडू असून, अशी चूक ती करेल असे वाटत नसल्याचे स्पष्ट मत ऑलिम्पिक पदकविजेता बॉक्सिंगपटू विजेंद्र सिंग याने व्यक्त केले आहे. एवढेच नव्हे, तर अंतिम फेरीपूर्वी तिला बाद करणे दुर्दैव असून, त्याचा निषेध केला पाहिजे, असे परखड वक्तव्य क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनी व्यक्त केले आहे. २०१२ च्या ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता कुस्तीपटू जॉर्डन बरोज यानेही विनेशला सातत्याने पठिंबा दिला आहे. 'आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेने नियम बदलावेत. जागतिक दर्जाच्या प्रतिस्पर्ध्यांशी तीन–तीन कठीण सामने खेळल्यानंतर कोणत्याही कुस्तीपटूवर सुवर्णपदकासाठी रात्रभर मेहनत करण्याची पाळी येता कामा नये. शिवाय १०० ग्रॅम म्हणजे एखादा साबणाचा बार, दोन अंडी किंवा एखादे किवी फळ. एवढ्याश्या गोष्टीमुळे संधी हुकणे हे समजण्यापलीकडचे आहे,' असे मत जॉर्ज याने व्यक्त केले आहे. मुळात ज्या ५३ किलो वजनी गटात विनेशला संधी मिळाली नाही, यामागे भारतीय कुस्ती संघाचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांचे कारस्थान असल्याचा आरोप केला जात आहे. हे जर खरे असेल, तर ती गंभीर बाब आहे. ही संधी जिला मिळाली होती, त्या अंतिम पंघालचा आता पहिल्याच फेरीत पराभव झाला आहे. संतापजनक बाब म्हणजे, अंतिम पंघालने ऑलिम्पिक व्यवस्थापनाने घालून दिलेल्या नियमांचा भंग केला आहे. ऑलिम्पिक गेम्स व्हिलेजमधून स्वतःचे काही सामान आणण्यासाठी अंतिमने बहीण निशाला पाठवले होते; पण या व्हिलेजमध्ये व्यवस्थापनाकडून दिलेल्या पासेसशिवाय इतरांना प्रवेश दिला जात नाही. अंतिमने स्वतःचा खेळाडूचा पास बहिणीला दिला. त्यामुळे अंतिमला पुढील सामन्यांसाठी अपात्र ठरवण्यात येऊन, सहायकांसह तिला भारतात हाकलून दिले. भारतासाठी ही खरोखरच लाजिरवाणी गोष्ट आहे. विनेशला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्याच्या निर्णयाविरोधात भारतीय कुस्ती महासंघाने अपील केले असले, तरी त्याला तसा काहीच अर्थ नव्हता. मुळात विनेशला तिचे प्रशिक्षक, आहारतज्ज्ञ आणि अन्य सहायकांनी अचूक मार्गदर्शन केले का, की बेफिकिरी दाखवली, याची चौकशी करण्याची गरज आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, कुस्तीगीर महासंघात भाजपचे तत्कालीन खासदार ब्रिजभूषण सिंह यांची दादागिरी व शोषणाविरोधात साक्षी मलिक, बजरंग पुनिया यांच्यासमवेत विनेशही रस्त्यावर उतरली होती.

# आता खरे गद्दार कोण हे प्रत्येक समाजाने ओळखावे.

भारतात आज एक अशी जमात आहे की,त्यांना पेट्रोल,डिझेल,आटा,गॅस,जीवन आवश्यक वस्तू,नोकरी,शिक्षण ,रोजगार,व्यवसाय,आरोग्य आणि सामाजिक बांधिलकी तसेच सर्वधर्मसमभाव,भारतीय संविधान,तिरंगा,समता,समानता,न्याय,बंधुत्व ह्या आणि अशा गोष्टींबाबत काहीही देणे घेणे नाही.बहुसंख्य हिंदूंना म्हणजेच बहुजन समाजाला ह्या सर्व मुद्द्यांपासून गोष्टींपासून ते दूर नेण्यात सक्सेस होताना दिसत आहे.सर्वसामान्य मानव,समाज ह्या सर्व गोष्टींना बळी पडताना दिसतो.आपण आपलाच समाज कोणत्या दिशेला घेऊन जात आहे याची थोडी ही शरम नाही म्हणजेच लाज नाही. महागाई सारखे आणि हे सर्व मुद्दे २०१४ च्या अगोदर होते. (तेव्हा महागाई वाढली की,सिलेंडर डोक्यावर घेऊन रोडवर निघायचे,पंतप्रधानांना बांगड्या पाठवायचे वगैरे वगैरे) आजही ते तसेच आहे.परिस्थिती बदलली अंधभक्तीत,व्यक्ती पूजा मध्ये वाढ झाली.आज ह्या सर्व गोष्टीवरून बोलणारा नालायक,चमचा,गद्दार,दलाल,देशबुडव्या,देशद्रोही,वगैरे वगैरे ठरत आहे. शेवटी तो कोणीही असो अक्षरशा तो आपल्या जातीचा असला तरीही आणि तो आपला स्वतःचा नातेवाईक असला तरीही. आता खरे गद्दार कोण हे प्रत्येक समाजाने ओळखावे.विशेष जे स्वताला हिंदू म्हणून घेतात त्या सर्व ओबीसी,एसटी इतर जाती जमातीच्या समाजातील लोकांनी.

या भूमीवरील संपूर्ण बहुजनाला,ओबीसी,आदिवासी,मूलनिवासी ,एसटी,एनटी सह सर्व मानव जातीला हिंदू बनऊन ब्राह्मणवादी संघटनेने फसवलेले आहे.परंतु आगीपेक्षा फुफाटा बरा अशी एक सर्वसामान्य माणसाची भावना झालेली आहे.बीजेपी हे संपूर्ण मूलनिवासांच्या फायद्याची हिताची नाही हेही सर्वांनाच माहिती आहे.त्यामुळे काँग्रेस, बीजेपी पेक्षा केव्हाही बरी कारण दुसरी कोणतीही मोठी संघटना बीजेपीला रोखू शकत नाही.हे सर्वसामान्य माणूस जाणून आहे. असे मत बहुतेक अभ्यासकांच मत आहे. काँग्रेस ही जुनी आणि संपूर्ण भारतभर पसरलेली आहे.आज जरी ती नायनाट झालेली आहे असे वाटत असले तरी पण त्या मताचे बहुतेक लोक आहेतच.त्यांना थोडा आजच्या परिस्थितीचा उजाळा करून दिला की पुन्हा बीजेपी मध्ये गेलेले सर्व काँग्रेसचे परत येण्याच्या वाटेवर असू शकतात. दुखावलेले नक्कीच येण्याचा प्रयत्न करतील पार्टीपेक्षा देश मोठा या भावनेचेही बरेच समाज बांधव नेते आहेतच. जे आपली जमवलेली माया लपवण्यासाठी गेलेले आहे. एकनिष्ठ नाहीत तेही परत येण्याच्या वाटेवर असू शकतात. आज बीजेपी मध्ये असणारे बहुतेक काँग्रेसची आणि तशाच विचारांची भरती झालेली आहे. मूळ बीजेपी चे लोक आता बीजेपी मध्ये असूनच एका साईडला लागलेले आहे. बाहेरील इतर राजकीय पक्षातून आयात केलेले नेतेच आज बीजेपी मध्ये आहे. तेव्हा ते कोणत्याही पार्टीचे नाही ते पूर्वी ज्या राजकीय पार्टीत होते ते त्यांचेच झाले नाही तर गेलेल्या पार्टीत ते आज आहे त्या पार्टीचे ही ते कधीही होणार नाही. जिकडे बम तिकडे हम अशीच भावना आज बऱ्याच राजकीय नेत्यांची कार्यकर्त्यांची आहे. जे लोक त्या नेत्यांना लोकांना पूर्वी शिवीगाळी करत होते आज त्यांचीच ते गुणगान,स्तुती करत आहे. उद्या जर राहुल गांधी ही त्यांच्यामध्ये गेला तर राहुल गांधी ही कितीही चांगला आहे त्यांचेही गुणगान होऊ शकते आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही आज पर्यंत महाराष्ट्रामध्ये जे घडलेले नाही ते घडून चुकलेले आहे सर्वांना सर्व माहीतच आहे आणि तशी सर्वांनी सवय करून घ्यावी मात्र मूळनिवासी बहुजन समाजाने खास करून एस सी,एनटी,ओबीसी ह्याच लोकांनी जास्त विचार करणे आवश्यक आहे आणि आपलाच स्वतःचा स्वतंत्र राजकी पक्ष आपला मजबुतीही करणे आवश्यक आहे आणि काँग्रेस सारख्या पक्षांचे किंवा समविचारी नेत्यांनी एकत्र येऊन ठोस पाऊले उचलणे,योग्य निर्णय घेऊन आपला कसा विकास होईल याचेही भान ठेवणे आवश्यक आहे.आपण नेहमी कसे सत्तेत राहू हा पण विचार करणे आवश्यक आहे.

जय भीम. जय शिवराय.

प्रभाकर खानजोडे ९४२०६२४२४३,पुसद यवतमाळ.

## वीरशैव पाचशे घर मठ संस्थानच्या स्वयंघोषित विश्वस्त मंडळाकडून महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांची पायमल्ली

लातूर : समस्त वीरशैव लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान असणाऱ्या लातूर येथील आझाद चौकातील वीरशैव पाचशे घर मठ संस्थानच्या स्वयंघोषित विश्वस्त मंडळाने समाजातील सर्वसामान्य नागरिकांना विश्वासात न घेता संस्थानची नवीन घटना सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करून महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांची पायमल्ली करण्याचे काम केले आहे. विश्वस्त मंडळाच्या या कृतीचा समाजातून तीव्र शब्दात निषेध केला जात आहे.

कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा कारभार सभासदांना विश्वासात घेऊन नेमण्यात आलेल्या विश्वस्त व कार्यकारी मंडळाकडून पारदर्शी पद्धतीने होणे आवश्यक असते. सार्वजनिक संस्था म्हटले की त्यात समाजातील विविध घटकातील नागरिकांना सभासद करून घेणेही क्रमप्राप्त असते. सभासदांशिवाय सार्वजनिक विश्वस्त संस्थाच अस्तित्वात असू शकत नाही. लातूरच्या वीरशैव पाचशे घर मठ संस्थानच्या ( नों. क्र. ए - १५३० / लातूर ) विश्वस्त मंडळाने, ज्यामध्ये श्रीकांत तमणप्पा उटगे, बाबासाहेब महारुद्रप्पा कोरे, विश्वनाथ प्रभूअप्पा निगुडगे, सिद्राम गुरुपदाप्पा पोपडे, रेवणप्पा शंकरपा कोरे, अशोक शरणापा उपासे, उमाशंकर सिद्रामप्पा नागुरे , भिमाशंकर सिद्रामप्पा बेंबळकर व महेश मल्लिकार्जुन स्वामी या नऊ जणांचा समावेश आहे. या विश्वस्त मंडळाने संस्थानची नवीन घटना मंजूर करून घेण्यासाठी लातूरच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल केली आहे.

दाखल करण्यात आलेल्या या घटनेत पाचशे घर मठाची सर्व स्थावर ,जंगम मालमत्ता हे विश्वस्त हयात असेपर्यंत त्यांच्या स्वाधीन राहील असेही म्हटले आहे. दाखल करण्यात आलेल्या घटनेतील मुद्दा क्रमांक ६ मध्ये विश्वस्त मंडळ हे कमीतकमी ७ व जास्तीत जास्त ११ सदस्यांचे राहील असे म्हटले आहे. तसेच हे विश्वस्त मंडळ तहहयात अस्तित्वात असेल असेही नमूद करण्यात आले आहे. तसेच संस्थेचे सभासद करून घेण्याबाबतचा मुद्दाच या घटनेत नसल्याने सभासद करून घेण्यासाठीची संस्था स्थापनेपासूनची मागणी अपूर्ण राहणार आहे. संस्थेचे दिवंगत विश्वस्त सिद्धलिंगप्पा टेंकाळे यांनी संस्थेचे काही सभासद करून घेऊन त्यांना रीतसर पावत्याही दिलेल्या आहेत. या स्वयंघोषित विश्वस्त मंडळाने स्व. सिद्धलिंगप्पा टेंकाळे यांनाही अंधारात ठेवून ही नवीन घटना मंजुरीसाठी दाखल केल्याचे दाखल करण्यात आलेल्या दस्तावेजावरून निदर्शनास येत आहे. पाचशे घर मठ संस्थानच्या बाबतीत विश्वस्त मंडळाकडून चक्क सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयाचीच दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालू असल्याचे दिसून येत आहे. ही बाब वीरशैव लिंगायत समाजाच्या दृष्टीने अत्यंत घातक असून ही नियमबाह्य घटना सहाय्यक धर्मादाय कार्यालयाने रद्दबातल करावी, अशी मागणी जनसामान्यातून होत आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या अध्यक्षपदी प्रेरणा होनराव यांची निवड

लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या अध्यक्षपदी प्रेरणा होनराव यांची निवड

लातूर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश प्रवक्त्या प्रेरणा होनराव यांची निवड करण्यात आली आहे. अशासकीय सदस्य म्हणून नवनाथ आल्टे , सदाशिव गव्हाणे यांची निवड झाली आहे. या योजनेसाठी लातूर शहर विधानसभा मतदार संघ क्षेत्रातून शुक्रवारी, दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत एकूण ८१ हजार ४०४ अर्जांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती प्रेरणा होनराव यांनी दिली. या योजनेसाठी लातूर विधानसभा मतदार संघ क्षेत्रातून ८५ हजार अर्ज दाखल झाले आहेत. कोणत्याही महिलेचा अर्ज बाद ठरला जाऊ नये, यासाठी प्रशासन व समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. जे अर्ज आज पूर्णपणे स्वीकृत झालेले नाहीत, ते आवश्यक त्या दुरुस्त्या करून पुन्हा दाखल केले जाणार आहेत. त्यामुळे एकाही बहीणीने आपला अर्ज मंजूर होणार नाही, याची भीती बाळगू नये,असे आवाहनही प्रेरणा होनराव यांनी केले आहे. दाखल झालेले



अर्ज तांत्रिक कारणावरून त्रुटीमध्ये दाखवले जात असले तरी अद्यावत मोबाईल यंत्रणेच्या सहाय्याने ते निर्धारित वेळेत दाखल करून घेतले जातील व या योजनेपासून अर्ज दाखल केलेली एकही भगिनी वंचित राहणार नाही, याची आपण व आपले सर्व सहकारी प्रशासनाच्या मदतीने योग्य ती दक्षता बाळगू, असेही प्रेरणा होनराव यांनी सांगितले. प्रशासनाने सर्वांच्या मदतीने अत्यंत कमी कालावधीमध्ये , अत्यंत उत्कृष्ट काम पूर्ण केले. एवढ्या कमी कालावधीत ८५ हजार अर्ज भरून घेणे ही जबाबदारी फार मोठी होती आणि ती प्रशासनाने लिलया पार पाडल्याबद्दल प्रेरणा होनराव यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी तथा सदस्य सचिव रोहिणी नऱ्हे - विरोळे, अशासकीय सदस्य नवनाथ आल्टे , सदाशिव गव्हाणे, सदस्य, तहसीलदार लातूर, मनपा उपायुक्त लातूर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, मनपा महिला व बालविकास अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची उपस्थिती होती.

## अधिवेशनात ग्रंथालयांच्या घोषित ४० टक्के अनुदान वाढीसह अन्य मागण्यांचा जीआर काढण्यासाठीचे शासनाला निवेदन सादर







लातूर :- महाराष्ट्रातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना वाढीव ४० टक्के अनुदान देणे,नवीन ग्रंथालयांना मान्यता देणे व दर्जा वाढीच्या अनुषंगाने राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनात घोषणा केली असून त्यासंदर्भातला शासन आदेश /जीआर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याअगोदर काढावा अशा मागण्यांचे राज्यातून आज शासनाला निवेदने देण्यात आली असून,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाच्यावतीनेही शुक्रवार,दि.९ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्यामार्फ़्त शासनाला निवेदन सादर करण्यात आले.

गेल्या दहा वर्षांपासून राज्यातील सुमारे बारा हजार सार्वजनिक ग्रंथालयांची दर पाच वर्षांची दुप्पट नैसर्गिक अनुदानवाढ,दर्जा बदल व नवीन शासन मान्यता आणि कर्मचार्यांच्या वेतनश्रेणी आदी प्रश्नांच्या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्यावतीने शासन दरबारी सातत्याने अविरत आंदोलने करत,निवेदने देवून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येत होता,त्यासाठी शासनाकडून विविध समित्या स्थापन केल्या गेल्या.१९६७ चा ग्रंथालय अधिनियम दुरुस्तीचा प्रयत्न झाला पण त्यांची अंमलबजावणी झालेली नाही.त्यामुळे ग्रंथालय चालक व ग्रंथालय कर्मचार्यांमध्ये शासनाप्रती रोष वाढत होता. दरम्यान २०२३ मध्ये राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सार्वजनिक ग्रंथालयाचे ६० टक्के अनुदान वाढ केले, उर्वरित ४० टक्के अनुदान वाढ व इतर प्रश्नांसाठी ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार व इतर पदाधिकारी राज्यातील आमदार,खासदार,मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे सातत्याने अर्ज,निवेदने करीत होते.त्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधिमंडळाच्या परवाच्या अधिवेनात राज्यातील सुमारे ११५०० सार्वजनिक ग्रंथालयांचे ४० टक्के अनुदानवाढ,दर्जा बदल व नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता देण्यासंदर्भात लेखी घोषणा केली होती.या घोषणेचा त्वरीत जीआर काढून राज्यातील दुर्लक्षित सार्वजनिक ग्रंथालयांना न्याय द्यावा या मागणीसाठी दि.९ ऑगस्ट २०२४ रोजी प्रत्येक जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य शासनाला निवेदन देण्याचा राज्य ग्रंथालय संघाने निर्णय घेतला होता.त्याचा एक भाग म्हणून मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले यांच्या नेतृत्वात लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना निवेदन सादर करण्यात आले. त्याचा कार्यालयात आणि बाहेरही स्वीकार करुन त्यांनी ते शासनाला पाठविण्याचे आश्वासन दिले.

या वेळी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, माजी अध्यक्ष संचालक हागवीराव बेरकीळे, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे,सहकार्यवाह काशिनाथ बोडके,उपाध्यक्ष युवराज जाधव,संचालक किरण बाबळसूरे,सूर्यकांत शिरसे,गुप्तलिंग स्वामी, जहांगीर सय्यद, अनिल पाटील, श्रीधर स्वामी, काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर, अशोक खोडवे,संतोश करमले,नंदकुमार घोगरे, तुकाराम सुगावकर,बालाजी सूर्यवंशी तसेच ग्रंथालय पदाधिकारी व्यंकट पनाळे,दगडू वंगवाडे, बालाजी साबदे, सुशील मेकले,लक्ष्मण सूर्यवंशी,मदारसाब शेख, किशोरचंद देशमाने, जळबा ढवळे, सचिन उफाडे,चंद्रकांत माने, भानुदास आंबेगावे, प्रल्हाद माळी, भिमराव गायकवाड, विद्यासागर गायकवाड, साहेबराव गायकवाड,राजकुमार भदरगे, यशंवत कुलकर्णी, नामदेव कांबळे, पांडुरंग जाधव, सोपान सूर्यवंशी, आशिष पाटील, बळीराम लोकरे, दिनकर बालूरे, प्रशांत ठाकूर, गुरुनाथ हवा, गंगाधर हवा, दिलीप लांडगे, संजय रकटारे, अकबर मुजावर,नागनाथ बिरादार, अशोक कारभारी, सूर्यकांत जाधव, विनायक बेद्रे, अंतराम मद्दे, शिवाजी बेद्रे, मनोगर गायकवाड, विनायक पाटील, लक्ष्मण चारोडे, दगडू गरड, संजय सूर्यवंशी, बालाजी जाधव, गिरीधर जंगाले, बाबुराव बरमदे, नेताजी चव्हाण,अविनाश तडकले, नागनाथ नागरगोजे, ज्ञानेश्वर गोरडे, मधुकर पवार, डॉ.संजय मोरे, भागवत पाटील,सुधीर जोशी, नबी सय्यद, प्रशांत गायकवाड, बळीराम मायंदे, रेहान सय्यद, शरीफ शेख, लक्ष्मण जगदाळे, रामराव बोपछडे,शिवाजी मुळे, विलास पूरी, लक्ष्णम शेंबाळे, बालाजी होनराव, चंद्रकांत दरेकर,शामराव टिकोरे,प्रकाश नागलगावे, प्रल्हाद बडे, ज्ञानोबा जानवळकर, महेश लवटे, शंकर रोटे, श्रीहरी बिरादार, बालाजी कोंपले,बालाजी बिरादार, शुभम चौधरी,उध्दव तावडे, चंद्रशेखर ढगे, अस्मिता अजनीकर, लक्ष्मण माशाळकर, प्रा.प्रताप पाटील, माधव बावगे, विलास नागरगोजे, आदींचा समावेश होता.

## श्रावणात नक्की बनवा गूळ-खोबऱ्याच्या सारोट्या, मोजक्या साहित्यापासून तयार होते रेसिपी

श्रावण महिना अखेर सुरु झाला आहे. हा महिना व्रत-वैकल्यांचा महिना म्हणून ओळखला जातो. हा महिना संपूर्णपणे भगवान शिवाला समर्पित केला जातो. अनेकजण या महिन्यात उपवास करतात, ज्यामुळे या महिन्यात अनेक गोडाचे पदार्थ आवर्जून बनवले जातात. त्यात हळदीच्या पानांच्या पातोळ्या, गव्हाचा हुंडा, गव्हाच्या लाह्या अशा अनेक पदार्थांचा समावेश असतो. यापैकीच एक आहे गूळ-खोबऱ्याच्या सारोट्या. गूळ-खोबऱ्याच्या सारोट्या हा पदार्थ फार कमी लोकांना माहिती असेल मात्र श्रावणात हा पदार्थ आवर्जून बनवला जातो. आज आम्ही तुम्हाला याची एक सोपी रेसिपी सांगत आहोत. तुम्ही जर हा पदार्थ कधी खाल्ला नसेल तर या श्रावणात एकदा हा पदार्थ नक्की बनवून पहा. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य २ वाटी बारीक रवा २ वाटी तीळ १ वाटी सुक्या खोबऱ्याचा कीस १ वाटी शेंगदाणे २ वाटी गूळ २ चमचे वेलची पूड तूप कृती गूळ-खोबऱ्याच्या सारोट्या बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात रवा घ्या आता या रव्यात गरम तूप घालून, ते पाण्याने मळून घ्या आणि काहीवेळ हे बाजूला ठेवून झाकून द्या यानंतर दुसरीकडे शेंगदाणे आणि खोबऱ्याचा कीस भाजून घ्या तीळ आणि शेंगदाण्याचे कूट एकत्र बारीक करून, गूळदेखील बारीक किसून घ्या आता तीळ आणि शेंगदाण्याचे कूट, खोबऱ्याचा कीस व गूळ एकत्र करून, हे मिश्रण पुन्हा एकदा मिक्सरमधून वाटून घ्या आता बारीक केलेल्या मिश्रणात वेलीची पूड घाला आणि मिक्स करा यानंतर भाजलेल्या रव्याच्या पिठाचे गोळे तयार करून घ्या प्रत्येक गोळ्याची पारी करून, त्यात १ चमचा तीळ-खोबऱ्याचे मिश्रण घाला आता या पारी पुरीप्रमाणे लाटून घ्या यानंतर गरम तव्यावर या तूप टाकून या सारोट्या खमंग भाजून घ्या अशाप्रकारे तुमच्या गूळ-खोबऱ्याच्या सारोट्या तयार होतील



# रिकाम्या पोटी खा भिजवलेले बदाम, फायदे ऐकून व्हाल आश्चर्यचकित



बदाम खाल्ल्याने आरोग्याला फायदे होतात, हे आपण आजी आजोबा किंवा घरातील मोठ्या व्यक्तींकडून ऐकले आहे. हे खरेच आहे. सकाळी उठल्यावर नियमित ५ ते ६ भिजवलेले बदाम खाल्ल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यापासून ते स्मरणशक्ती चांगले राहण्यापर्यंत अनेक फायदे होतात. बदामामध्ये फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि ओमेगा-३ फॅटी सिड असतात, ज्यामुळे अनेक गंभीर आजारांपासून शरीराचा बचाव होतो. सकाळी उठल्यावर भिजवलेले बदाम खाल्ल्याने शरीरात दिवसभर ऊर्जा कायम टिकून राहते. तसेच दिवसाची सुरुवात चांगली होते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला भिजवलेले बदाम खाल्ल्याने आरोग्याला नेमके काय फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.भिजवलेले बदाम खाल्ल्याने आरोग्याला होणारे फायदे: रक्तातील साखर नियंत्रणात राहते: मधुमेह या गंभीर आजाराने अनेक लोक त्रस्त आहेत. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या जाणवू लागतात. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहण्यासाठी रोजच्या आहारात भिजवलेल्या बदामाचे सेवन करावे. बदामांमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, तसेच साखरेचे प्रमाण कमी असल्यामुळे मधुमेह किंवा इतर आजाराने त्रस्त असलेले रुग्ण सुद्धा बदामाचे सेवन करू शकतात.

वजन नियंत्रणात राहते: बदाम खाल्ल्याने वजन नियंत्रणात राहते. बदामामध्ये मुबलक प्रमाणात फायबर आढळून येतात. तसेच सकाळी उठल्यानंतर भिजवलेले बदाम खाल्ल्यामुळे पोट जास्त वेळ भरलेले राहते. यामुळे लवकर भूक लागत नाही. बदाम खाल्ल्याने शरीराला कमी कॅलरी मिळतात. तसेच शरीराला ऊर्जासुद्धा मिळते.

पचनासाठी फायदेशीर: पचनक्रिया सुधारण्यासाठी आहारात बदामाचे सेवन करावे. बदामामध्ये असलेल्या फायबरमुळे खाल्ले अन्नपदार्थ सहज पचते.यामुळे पोटासंबंधित कोणत्याही समस्या उद्भवत नाहीत. तसेच आतड्याचे आरोग्य सुधारण्यासाठी मदत होते.

कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहते: वाढलेले कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. त्यामुळे तुम्हीसुद्धा कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आहारात भिजवलेल्या बदामाचे सेवन करू शकता. बदामामध्ये ओमेगा-३ फॅटी सिड असते, जे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यासाठी मदत करते. नियमित बदामाचे सेवन केल्यामुळे हृदयविकाराचा धोका टाळतो. त्वचेसाठी गुणकारी: अँटी-ऑक्सिडंट्स आणि विटामिन ई युक्त बदाम खाल्ल्याने त्वचेला अनेक फायदे होतात. त्वचा रंग सुधरण्यासाठी आणि त्वचा निरोगी ठेवण्यासाठी बदाम अतिशय प्रभावी आहेत.विटामिन ई त्वचेची आर्द्रता टिकवून ठेवण्यास मदत करते. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर नियमित भिजवलेल्या बदामाचे सेवन करावे.

## हर घर झेंडा उपक्रम अंतर्गत मनपा.कार्यालयात झेंडा विक्री केंद्र सुरु



लातूर/प्रतिनिधी: हर घर झेंडा उपक्रम अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका कार्यालयात सखी महिला बचत गटामार्फत झेंडा विक्री केंद्र सुरु करण्यात आले याचे उदघाट्न मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, अधीक्षक खदीर शेख,शिक्षणाधिकारी साहेबराव जाधव, भांडारपाल बालाजी शिंदे, शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव, नितीन सुरवसे, बचत गट अध्यक्षा संगिता बरुरे व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## घरच्या घरी गुलाबपाणी बनवण्याची सोपी पद्धत जाणून घ्या

बहुतेक लोक आपले सौंदर्य वाढवण्यासाठी गुलाबपाणी वापरतात. रसायनमिश्रित गुलाबपाणीही बाजारात उपलब्ध आहे. पण ते अगदी सहज घरी बनवता येते. गुलाबपाणी तुमच्या त्वचेसाठीही खूप फायदेशीर आहे. घरी गुलाबपाणी कसे बनवायचे? तुमच्या त्वचेची काळजी घेण्याच्या दिनचर्येत गुलाबपाणी समाविष्ट करण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. तुम्हाला तुमची त्वचा चमकदार, डागरहित आणि निर्दोष बनवायची असेल, तर घरीच शुद्ध गुलाबपाणी बनवून पाहा. घरी बनवलेले गुलाबपाणी हे तुमच्या त्वचेसाठी वरदानापेक्षा कमी नाही. घरी गुलाबपाणी बनवण्याची सोपी पद्धत जाणून घेऊया. घरी गुलाबपाणी बनवण्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला ताज्या गुलाबाच्या पाकळ्या चांगल्या प्रकारे स्वच्छ कराव्या लागतील.

# हुतात्मा स्मारकास अभिवादन करून, आझाद मैदान मुंबई येथे अ. भा. संतुजी ब्रिगेडचे बेमुदत उपोषण सुरू

मुंबई /प्रतिनिधी :- दि.९ऑगस्ट २०२४ रोजी अखिल भारतीय संतुजी ब्रिगेड संस्थापक अध्यक्ष अँड. प्रदिपसिंह.तु.गंगणे यांच्या नेतृत्वाखाली हुतात्मा स्मारकास अभिवादन करून महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आझाद मैदान मुंबई येथे बेमुदत उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मागण्या १) हिंदूखाटीकसमाजभूषण,महामानव,सत्यशोधक समाजाचे अग्रदुत डॉ.संतुजी रामजी लाड यांची ४ मार्च जयंती तर ८ ऑक्टोबर पुण्यतिथी शासन स्तरावर साजरी करण्यात यावी व तसेच डॉ संतुजी रामजी लाड यांचे नावे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे. २) महाराष्ट्रातील हिंदु खाटीक समाजाला विविध भागात विविध नावाने उदा. मराठा खाटीक,क्षत्रिय खाटीक,धनगर खाटीक, कलाल,खाटीक कलाल, बक्कर कसाब, लाड खाटीक, बक्कर खाटीक या नावाने ओळखले जाते. जे सर्व पिढ्यान पिढ्या लहान प्राण्यांचे मांस विक्रीवर उपजीविका भागविनारे एकमेकांचे रक्त-नातेवाईक खाटीक जातीचे असल्याची वस्तू स्थिती शासनाने स्वीकारावी. ३)डॉ.संतुजीरामजीलाडयांचेनावेसमाजमंदिर, सांस्कृतिक सभागृह, समाज भवनसाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्यात यावा. ४) डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था (बार्टी ) पुणे व मिटकॉन लि.मार्फत मटन व्यवसायिकांना चिकन,मटन,मासे फूड प्रोसेसिंग च्या माध्यमातून जोडधंदा उभारण्यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे,तसेच दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विविध




व्यवसाय निशुल्क क्षमता बुद्धी प्रशिक्षण कार्यक्रमात प्रशिक्षण देणे. ५) शिवचित्रकार कलायोगी गोपाळराव बळवंतराव कांबळे कोल्हापूर यांना मरनोपरांत महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे. ६)संत उपासराव महाराज नागपूर संत गंगानाथ महाराज मठ, पुणे यांच्या विकासासाठी आर्थिक भरीव निधीची तरतूद करण्यात यावी. ७) हिंदु खाटीक समाजाच्या उन्नतीसाठी कलस्टर हाऊसची निर्मिती करावी तसेच डॉ संतुजी रामजी लाड यांच्या नावे शैक्षणिक संकुल ,निवासी विद्यालय निर्माण करण्यात यावे. ८) महाड चवदार तळे क्रांतिकार लढयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सहकारी रामचंद्र खडूजी कांबळे उर्फ चंदू मामा खाटीक, स्वातंत्र्यसैनिक उद्धवराव इंगोले, व स्वातंत्र्यसैनिक रघुनाथनाना जाधव, अशोक पेंढारी यांच्या नावे सामाजिक न्याय विभागातर्गत पुरस्कार देण्यात यावा. ९) डॉ.संतुजी रामजी लाड यांचा जन्म, कार्य ठाणे जिल्ह्यामध्ये होते तसेच ते ठाणे तत्कालीन नगर पालिकेचे सदस्य म्हणून ही कार्यरत होते त्यामुळे त्यांचे ठाणे शहरात स्मरण व्हावे यासाठी ठाणे,लातूर या ठिकाणी ऐतिहासिक स्थळांच्या विकासांतर्गत स्मारक, अभ्यासिका, ग्रंथालय उभारण्यात यावे. १०) महाराष्ट्र राज्यात मा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एस सी प्रवर्गाचे अ ब क ड वर्गीकरण करणार असाल तर हिंदू खाटीक जातीसाठी स्वतंत्र ५% टक्के आरक्षण आरक्षित ठेवण्यात यावे. आदी मागण्यासाठी अँड अमितकुमार कोथमिरे सोलापूर, श्री सुनिलकुमार कांबळे छत्रपती संभाजी नगर, श्री संजयकुमार साबणे नांदेड, श्री बालाजी बिनवडकर, डॉ रावसाहेब खिरडकर जातेगाव नाशिक, पत्रकार साईनाथ घोणे,श्री दिगंबर कांबळे लातूर,अमोल फिसके देवणार मुंबई, श्री योगेश डोंगरे, श्री महेश विजापूरे, श्री इंद्रजित गंगणे, श्री चंद्रकांत आबा थोरात, श्री सुरेश थोरात पुणे, श्री सूरज कांबळे आदींनी सहभाग नोंदविला आहे

## स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, उप-परिसर, लातूर, सामाजिक शास्त्रे, संकुलातील विद्यार्थ्यांचे युजीसी सेट परिक्षेत घवघवीत यश



लातूर : - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उप-परिसर लातूर येथील सामाजिक शास्त्रे, संकुलातील एकूण ५ विद्यार्थी या वर्षी घेण्यात आलेल्या सेट परिक्षेत प्रावीण्यासह पास झाले आहेत. या वेळी सेट परीक्षा पास झालेल्या चक्रधर शेवाळे, समाजकार्य. विजयकुमार उपाडे, समाजशास्त्र तर सावधान कांबळे, प्रणव गंडले, यशोदा गायकवाड अर्थशास्त्र विषयात सेट पास झाले आहेत. सदरील विद्यार्थ्यांचे सामाजिक शास्त्रे संकुलांच्या वतीने संचालक डॉ. सागर कोंडेकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.अनिल जायभाये आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.एच. कडेकर यांच्यासह विद्यापीठ, उप-परिसर संचालक, डॉ. राजेश शिंदे व सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

## अॅड पल्लवी गायकवाड यांचा सत्कार.

. अहमदपूर :- समाजभूषण संजयभाऊ कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त अहमदपूर शहरामध्ये आरक्षण आणि संरक्षण हक्क परिषद मोठ्या प्रमाणात पार पडले.यामध्ये या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती ड रमेश भाई खंडागळेद औरंगाबाद. आर डी जोगदंड आंबेडकरवादी विचारवंत .ड शिवाजी आदमाने जालना. प्रा बालाजी आचार्य अहमदपूर. सुनील सौदागर लातूर.आदींची उपस्थिती होती . ड पल्लवी.पुजा मेघराज गायकवाड हे अहमदपूर कोर्टा मध्ये बौद्ध समाजातून पहिली महिला म्हणून तिचा समितीच्या वतीने आज प्रशस्तीपत्र देऊन वरील मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला व पुढील काळामध्ये सर्व समाजासाठी भारीव काम करावं ही शुभेच्छा दिल्या.यावेळी तालुक्यातील हजारो महिला पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते लातूर दयानंद विधी कॉलेज माधून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल अहमदपूर येथील ड टि एन कबळे. ड डी एल घोगरे. ड भारतभूषण क्षीरसागर.ड बी एस मुंडे. ड व्यकटराव नाईकवाडे लातूर. ड रमेश राठोड पुणे. ड सुहास चाटे. ड एन एम देमगुडे.ड जुनेद सौदागर. ड




बसवेश्वर कुमदळे.ड उद्धव जाधव. ड विजय सोनकाबळे. ड सय्यद अन्वर .ड स्वप्निल व्होते. ड नागेश नऊटक्के.ड सुहास पाटील. ड ए बी डक.ड सपना नळेगाकर.ड सुवर्णा महाजन. ड मधुबाला कराड .सय्यद एफ एस अधीक्षक जिल्हा कोर्ट अहमदपूर.सुधाकर हातगळे सहाय्यक अधीक्षक. भालचंद्र आलापुरे पोस्टमास्तर.प्रा रत्नाकर नळेगावकर.सुरेश डबीर जस्ट पत्रकार यांचे मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. पुजा मेघराज गायकवाड.उद्धवजी ईपर.सुनील रणावरे. डा सिद्धार्थकुमार सुर्यवंशी. आकाश रणावरे. डा बशीद पठाण. प्रकाश वाहुळे.शेषराव ससाणेसर. संदिप गायकवाड.प्रा राहुल गायकवाड.अदिने अभिनंदन केले आहे.

## ग्रामस्तरीय अधिका-यांनी प्रशासनास वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, नागरिकांनी सर्व विभागप्रमुखांना साथ देऊन विकास साधावा - सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना

किनवट/शेख शौकत :-किनवट जनता व प्रशासन यातील महत्वाचा दुवा असलेल्या ग्रामस्तरावरील तलाठी व ग्रामसेवक यांनी आपल्या वरिष्ठांना कोणतीही माहिती वस्तुनिष्ठपणे द्यावी. त्यावरूनच प्रशासकीय अधियांना सर्वसामान्यांच्या हितासाठी शासनाच्या योजना थेट त्यांच्यापर्यंत यशस्वीपणे पोहचविता येतील. तसेच नागरिकांनीही वेळोवेळी सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांना साथ देऊन आपल्या गावचा, परिसराचा विकास करून घ्यावा, असे प्रतिपादन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केले. येथील तहसील कार्यालयात महसूल पंधवडा निमित्त बुधवारी (दि. ०७) आयोजित विविध प्रमाणपत्र व योजनेसह नैसर्गिक आपत्तीचे धनादेश वाटप आणि उत्कृष्ट कार्य करणाया अधिकारी कर्मचारी यांच्या गौरव कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे प्रभारी तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार विकास राठोड, नंदन त्रिभूवन रामेश्वर मुंडे, प्रकल्पाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक अनिल कवडे मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी आमदार भीमराव केराम यांचे स्वीय सहायक संतोष मरसकोल्हे यांनीही हजेरी लावली होती. पत्र मंजूर कोलाम दावेदारास युरिया / प्रमाण उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. याप्रसंगी तहसीलदार डॉ. चौंडेकर यांनीही आपले विचार मांडले. याप्रसंगी मयत जनावरांऐवजी नवीन पशुधन



खरेदीसाठी अल्पभूधारक शेतकरी यांना मदत, घरपड लाभार्थी मदत, संजय गांधी निराधार योजने अंतर्गत करण्यात अतिदूर्गम वाघदरी येथील पाच अनुसूचित लाभार्थीना मदत, दिव्यांगांना अंत्योदय प्राधान्य कुटूंब योजना नवीन ई शिधापत्रिका जात, रहिवाशी, उत्पन्न प्रमाण वैयक्तिक वनहक्क झालेल्या आदिम जमातीच्या मालकी प्रमाणपत्र कृषी विभागाकडून नॅनो डीएपी व गट नोंदणी पत्र वाटप, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकारी-कर्मचारी बीएलओ विद्यार्थी स्वयंसेवक व माजी सैनिक यांचा प्रशस्त्रीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान आला. नंतर दीपाली कांबळे, पी.पी. पांपटवार कर्णेवाड, सविता खान, धोंड, वाघाडे, वनहक्क जमाती प्रवर्गातीला व पाच विमुक्त जाती भटक जमाती इतर मागास प्रवर्गातील लाभार्थीना जातीचे प्रमाण पत्र वाटप करण्यात आले. वाघदरीच्या ग्रामस्थांनी मॅडम आमच्या गावी या, आमच्या समस्या पहा असे निमंत्रण दिल्यावरून सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना म्हणाल्या, मूलभूत गरजांसाठी आवश्यक बाबीचा आपल्या ठराव आम्हास द्या, आम्ही वरिष्ठांकडे पाठपुरावा करू , आपल्या जरूर येईलच ! यशस्वीतेसाठी अव्वल कारकून ग्रामपंचायतीचा गावी २० ऑगष्ट कार्यक्रमाच्या विजय सुरुशे पिंजरकर, कैलास महसूल सहायक सूर्यवंशी, गोविंद , पुसनाके, अर्चना एस.बी. पवार, रणखांब, फिरोज लिंबेश राठोड, नामदेव संतोष मपडे, अमोल मनोहर पाटील, व्यवस्थापक महेश राठोड आदिंनी परिश्रम घेतले

# पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २० ऑगस्ट २०२४ रोजी मंत्रालयात दाखल होणार..!

नवी मुंबई / के. एच. हनवते :- नागपूरच्या दीक्षाभूमीला अभिवादन करून दिनांक : २८ जुलै २०२४ पासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, प्रदेशाध्यक्ष : वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संवाद यात्रा सुरु झालेली असून, सदर पत्रकार संवाद यात्रेचा समारोप दिनांक : २० ऑगस्ट २०२४ रोजी मंत्रालय, मुंबई येथे पत्रकारांच्या विविध समस्या व न्याय हक्कासाठी मंत्रालयांमध्ये साकडे घालून होणार आहे. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर, तसेच प्रमुख पत्रकार यावेळी संवाद यात्रेबद्दल पत्रकारांच्या प्रश्नासंदर्भात संवाद साधतील. लोकशाहीत वृत्तपत्र आणि पत्रकार चौथा स्तंभ मानला जातो. मात्र अलीकडे वाढती महागाई आणि समाजमाध्यमांचा वापर यामुळे पत्रकारांसमोर अनेक अडचणी निर्माण होत आहेत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेत विविध माध्यमात काम करणारे ३० हजार पेक्षा अधिक सदस्य असल्याने पत्रकारांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष जावे आणि समाजाचाही पाठींबा मिळावा, यासाठी राज्य पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांनी दिक्षाभूमी ते मंत्रालय अशी संवादयात्रा काढण्याचा निर्णय घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिक्षाभूमी नागपूर येथून यात्रेला सुरूवात झाली असून प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक पत्रकार, समाजातील विविध घटकांशी संवाद करत या यात्रेचा समारोप मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सभागृहात २० ऑगस्ट रोजी दु. १ वाजता होणार आहे. राज्याचे प्रमुख म्हणून आपण राज्यातील पत्रकारांच्या मागण्यांना न्याय द्यावा, अशी विनंती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात येत आहे. वृत्तपत्र आणि पत्रकारांच्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत : - १) केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना (डिजीटलसह) उत्पन्न करात वार्षिक ५ हजार रुपये सूट द्यावी. असा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा. ज्यामुळे वृत्तपत्राची मागणी वाढून या व्यवसायाला स्थिरता येईल. २) सरकारने वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीवरील ५ % जीएसटी कर रद्द करावा. ३) महाराष्ट्र शासनाने ग्रामपंचायतींना वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी १० हजार रुपये तरतूद करावी. ४) बाळशास्त्री जांभेकर निवृत्ती योजनेतील जाचक अटी रद्द कराव्यात. (सलग तीस वर्षे सेवेची) ५) अधिस्विकृती पत्रिका ग्रामीण भागातील पत्रकारांना मिळावी यासाठी प्रक्रिया सुलभ

> संपूर्ण महाराष्ट्राच काय तर संबंध देशातून पहिल्यांदाच निघालेल्या लोकशाईचा चौथास्तंभ - वृत्तपत्र/ पत्रकार संवाद यात्रेचे महाराष्ट्रातील विविध जिल्हा / तालुकास्तरावर पत्रकार संवाद यात्रेचे जंगी स्वागत

करावी. विशेषतः ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी वेतन पावतीची अट रद्द करावी. बहुतांशी पत्रकार मानधनावर काम करतात. ६) पत्रकार संरक्षण कायद्याची स्थानिक पातळीवर अमलबजावणी करण्यासाठी पोलिस प्रशासनाला आदेश द्यावेत. तसेच थेट गुन्हा दाखल न करता पत्रकारांविरुद्ध तक्रार आल्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करूनच कारवाई करावी. ७) राज्यात पत्रकारांसाठी शासकीय जमीन म्हाडाला देवून जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र घरकुल योजना राबवावी. ८) अधिस्विकृती समितीवर कामगार कायदा (लेबर युनियन क्ट १९२६) अंतर्गत नोंद असलेल्या संघटनांना प्रतिनिधित्व द्यावे. ९) राज्य, जिल्हा, तालुका शासकीय समित्यांवर स्थानिक पत्रकारांचा एक प्रतिनिधी घ्यावा. १०) भारतीय राज्य घटनेतील तरतूदीप्रमाणे राष्ट्रपतीनियुक्त राज्यसभेत, राज्यपालनियुक्त विधानपरिषदेत पत्रकारांमधून प्रतिनिधित्व द्यावे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्विकृत सदस्य म्हणून स्थानिक पत्रकारांतून प्रतिनिधीत्व द्यावे. ११) अधिस्विकृतीधारक पत्रकारांना रेल्वे, विमान, स्लिपर कोच, बस प्रवासात सवलत द्यावी. रेल्वे आरक्षणात ५० टक्के सुट द्यावी. १२) अधिस्विकृतीधारक पत्रकारांच्या वाहनांना महामार्गावर टोलमाफी द्यावी. १३) पत्रकारांच्या पाल्यांना उच्च व परदेशी शिक्षणासाठी विशेष सवलत द्यावी. १४) शासकीय जाहिरातींचे दरात महागाईच्या तुलनेत दर दोन वर्षांनी वाढ करावी. १५) डिजीटल मिडीयाला (न्युज पोर्टल, युट्यूब चॅनेल) निकष ठरवून शासनमान्यता द्यावी. १६) शासकीय जाहिराती देताना समान न्यायाच्या सुत्राने यादीवरील दैनिके, साप्ताहिक यांना देण्यात याव्यात. वर्गवारीच्या नावाखाली जिल्हा, तालुकास्तरीय दैनिके व साप्ताहिकांवर होणारा अन्याय थांबवावा. तसेच महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी शासनाच्या आदेशानुसार सर्व दैनिके व साप्ताहिकांना चक्राकार पध्दतीने जाहिराती द्याव्यात. वर्षातून चार दर्शनी जाहिराती पुन्हा नव्याने सुरू करून देण्यात याव्यात. १७) कोरोनाचा वृत्तपत्रांच्या खपावर परिणाम झाला असल्याने द्विवार्षिक पडताळणीसाठी नव्याने खपाबाबत निर्णय घ्यावा. तसेच नव्याने शासन यादीवर येण्यासाठी १ हजार खपाची आकडेवारी करण्यात यावी. १८) २५ वर्षे पूर्ण केलेल्या दैनिक व साप्ताहिकांना द्विवार्षिक पडताळणीतून वगळावे. १९) वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक माध्यमातील वाढते कंत्राटीकरण थांबवण्यासाठी शासनाने स्वतंत्र समिती नेमावी. २०) पत्रकारांची गणना करून त्यांना शासकीय लाभ देण्याचा निर्णय घ्यावा. २१) माध्यमांच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र कायदा करावा. २२) जिल्हा, तालुका पातळीवरील प्रमुख शासकीय कार्यालयात पत्रकार कक्ष स्थापन करावा. २३) माध्यम समुहाकडून नाममात्र मानधन मिळत असल्याने पाच वर्षे सेवा करणाऱ्या पत्रकारांना दरमहा मानधन योजना सुरू करावी. २४) जुनी वर्तमानपत्रे ही मुल्यवान ठेवा असल्याने ऐतिहासिक घटना जतन करण्यासाठी त्यांना संगणीकृत करण्यासाठी विशेष सवलत द्यावी. २५) अधिस्विकृती धारक कार्ड देताना दुय्यम व्यवसाय करणार नाही या प्रतिज्ञापत्राची अट कमी करावी. २६) मतदारसंघ पुर्नरचनेत शिक्षक पदवीधर यांच्याप्रमाणे पत्रकारांसाठीही स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करावा. अशा प्रकारच्या मागण्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून सरकारकडे करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ • मुंबई •

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE